शेतकरी आत्महत्या प्रकरणी मदत देण्यासाठी उणे प्राधिकार पत्रावर कोषागारातून रक्कम काढण्यासाठी जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करणे व उपलब्ध निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक : एससीवाय-२०१९/प्र.क्र.१३६/म-७
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२ ऑगस्ट, २०१९

प्रस्तावना :

जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरविलेल्या शेतकरी आत्महत्या प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना रु.१.०० लक्ष मदत देण्यात येते. प्रत्येक वर्षी शेतकरी आत्महत्या किती होतील याचा अंदाज बांधणे शक्य नसल्यामुळे सदर मदत देण्यासाठी जिल्हाधिकारी यांना लेखाशीर्षाखाली नाममात्र रक्कम वितरित करून वर्षभरामध्ये या प्रयोजनासाठी होणारा खर्च उणे प्राधिकार पत्रावर कोषागारातून काढण्यासाठी त्यांना प्राधिकृत करण्यात येते. या बाबीवर झालेल्या खर्चाचे समायोजन अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये पुरवणी मागणीव्दारे करण्यात येते. मुख्य लेखाशिर्ष २२३५ ३१९५ अंतर्गत सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात करण्यात आलेली तरतुद सर्व जिल्हाधिकारी यांना वाटप करण्यासाठी सर्व विभागीय आयुक्त यांना वितरीत करण्याची व या बाबीवर होणारा खर्च उणे प्राधिकार पत्रावर कोषागारातून आहरित करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे झालेल्या शेतकरी आत्महत्या प्रकरणी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना तातडीने मदत देण्यासाठी मागणी क्रमांक सी-५, मुख्य लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण ०२, समाजकल्याण - १०४, वृध्द, अपंग व निराश्रीतांचे कल्याण (००)(०३) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांना वित्तीय सहाय्य (अनिवार्य) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (दत्तमत) (२२३५ ३१९५) या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या रू १७.०० लक्ष इतक्या तरतूदीपैकी रु.५.६६ लक्ष एवढा निधी दिनांक २२ मे, २०१९ च्या शासन निर्णयाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आला आहे. आता उर्वरित रु.११.३४ लक्ष (रूपये अकरा लक्ष चौतीस हजार फक्त) इतका निधी जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करून देण्यासाठी या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र “अ” मध्ये नमूद केल्यानुसार विभागीय आयुक्त यांना वितरीत करण्यात येत आहे.

२. नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या कारणामुळे झालेल्या शेतकरी आत्महत्त्यांच्या प्रकरणात विहित प्रक्रिया पूर्ण करून आत्महत्त्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना तातडीने मदतीचे वाटप करण्यात यावे.

३. या प्रयोजनासाठी होणारा खर्च भागविण्यासाठी सदर तरतूद पुरेशी नसल्याने आत्महत्त्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मदत देण्यासाठी कोषागारात सादर करण्यात येणारी देयके उणे प्राधिकार पत्रावर पारित करण्याची सुविधा सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी देखील चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार या प्रयोजनासाठी उणे प्राधिकार पत्रावर कोषागारातून निधी आहरित करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे

४. मागणी क्रमांक सी-५ , मुख्य लेखाशीर्ष २२३५ ३१९५ खाली सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात उणे प्राधिकार पत्रावर देयके काढून केलेल्या खर्चाचा हिशेब ठेवण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी

यांनी त्यांच्या कार्यालयातील जबाबदार अधिकाऱ्यावर सोपवावी व सदर जबाबदार अधिकाऱ्यांनी डिसेंबर, २०१९ अखेर या लेखाशीर्षाखाली झालेला एकूण प्रत्यक्ष खर्च व मागील तीन वर्षातील जानेवारी ते मार्च या ३ महिन्याच्या कालावधीत झालेल्या प्रत्यक्ष खर्चावर आधारीत सरासरी अपेक्षित खर्च निश्चित करुन संपूर्ण आर्थिक वर्षाचा खर्चाचा तपशील शासनास १५ जानेवारी, २०२० पर्यंत कळवावा. सदर खर्चाच्या तपशीलाच्या आधारे पुरवणी मागणी / खर्चाचे सुधारीत अंदाज सादर करण्यात येतील.

५. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: ३००/व्यय-९/२०१९, दिनांक २६/०७/२०१९, अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८२२१७०२२८४९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.08.22 17:16:05 +05'30'

(सुभाष उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त,
२. सर्व जिल्हाधिकारी,
३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
४. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
५. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
६. संचालक, लेखा व कोषागारे, मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. उप सचिव (व्यय-९/अर्थ-६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. उप सचिव, (ब-१/२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. कक्ष अधिकारी (म-३/म-११), महसूल ववन विभाग, मुंबई,
११. निवडनस्ती कार्यासन म-७

शासन निर्णयक्रमांक :एससीवाय-२०१९/प्र.क्र.१३६/म-७, दिनांक : २२ ऑगस्ट, २०१९

विवरणपत्र - "अ"

अ.क्र.	विभागीय आयुक्त तथा नियंत्रक अधिकारी	वितरीत अनुदानाची रक्कम (रुपये लाखात)
१	कोकण	१.३४
२	पुणे	२.००
३	नाशिक	२.००
४	औरंगाबाद	२.००
५	अमरावती	२.००
६	नागपूर	२.००
	एकूण	**११.३४**